लोकमत

# 'प्रज्ञा विद्यालयात सायबर जागृती'



**फुरसुंगी :** क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षणासाठी सायबर सुरक्षा २०२६' या उपक्रमांतर्गत फुरसुंगी-गंगानगरमधील प्रज्ञा प्राथमिक विद्यालयात सायबर जनजागृती सत्र उत्साहात पार पडले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुवर्णा ससाणे यांच्या उपस्थितीत आयोजित या सत्रामध्ये अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे सायबर वॉरियर्स प्रणव तळेकर आणि रोहन लिंभोरे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व, ऑनलाइन फसवणूक, मजबूत पासवर्ड, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, सुरक्षित इंटरनेट वापराबाबत मार्गदर्शन केले.

Hello Pune
Page No. 5 Jul 28, 2026
Powered by: erelego.com